# प्रेस नोट

**अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**

**दि.१४.०६.२०२३**

आरोपी **१)** आलोसे विनोद शंकर जाधव, वय–४२,प्रभारी मुख्याध्यापक,महात्मा फुले हायस्कुल,एरंडोल जि.जळगांव रा.पारोळा जि.जळगांव **वर्ग–२, २)** आलोसे नरेंद्र उत्तम वाघ, वय–४४,कनिष्ठ लिपीक,महात्मा फुले हायस्कुल,एरंडोल जि.जळगांव रा. पाचोरा जि.जळगांव **वर्ग ३, ३)** विजय पंढरीनाथ महाजन, वय–५६,अध्यक्ष,श्री.सावता माळी शिक्षण प्रसारक मंडळ,जळगांव संचलीत महात्मा फुले हायस्कुल,एरंडोल जि.जळगांव रा.माळी वाडा,एरंडोल जि.जळगांव **(आरोपी)** यांना बदली रद्द करण्याच्या प्रस्ताव पाविणेच्या मोबदल्यात आलोसे क्रं.१ यांनी आरोपी क्रं.३ यांचेसाठी त्यांचे एक महिन्याचा पगार ७५,०००/–रुपयाची लाचेची मागणी चेक स्वरुपात करुन सदरचा चेक आलोसे क्रं.२ यांच्या उपस्थितीत स्विकारला स्वत:स्वीकारली म्हणुन गुन्हा.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **घटक** | :– | जळगांव. |
| २ | **गुन्हा नोंद क्रमांक** | :– | एरंडोल पो.स्टे. गु.र.नं.१०६/२०२३ |
| ३ | **कलम** | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७, ७अ व १२ प्रमाणे. |
| ४ | **आरोपीचे नांव व कार्यालय** | :– | १) आलोसे विनोद शंकर जाधव, वय–४२,प्रभारी मुख्याध्यापक,महात्मा फुले हायस्कुल,एरंडोल ता.एरंडोल जि.जळगांव रा.योगेश्वर नगर,कजगांव रोड,पारोळा ता.पारोळा जि.जळगांव **(शिक्षण विभाग, वर्ग २)**<br>२) आलोसे नरेंद्र उत्तम वाघ, वय–४४,कनिष्ठ लिपीक,महात्मा फुले हायस्कुल,एरंडोल जि.जळगांव रा.समर्थ नगर, पाचोरा ता.पाचोरा जि.जळगांव **(शिक्षण विभाग, वर्ग ३)**<br>३) विजय पंढरीनाथ महाजन, वय–५६,अध्यक्ष,श्री.सावता माळी शिक्षण प्रसारक मंडळ,जळगांव संचलीत महात्मा फुले हायस्कुल,एरंडोल ता.एरंडोल जि.जळगांव रा.माळी वाडा,एरंडोल ता.एरंडोल जि.जळगांव **(आरोपी)** |
| ५ | **मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम** | :– | दि.१३/०६/२०२३ रोजी<br>फिर्यादी यांचा एक महिन्याचा पुर्ण पगाराची रक्कम ७५,०००/–रुपये चेक स्वरुपात लाचेची मागणी केली आहे. |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :– | फिर्यादी यांचा एक महिन्याचा पुर्ण पगाराची रक्कम ७५,०००/–रुपयाचा चेक |
| ७ | **गुन्हा दाखल तारीख** | :– | दि.१४/०६/२०२३ |
| ८ | **थोडक्यात माहीती** | :– | यातील फिर्यादी व त्यांचे सहकारी मित्र उप शिक्षक श्री.गोपाल चौधरी हे श्री सावता माळी शिक्षण प्रसारक मंडळ जळगांव संचलीत महात्मा फुले हायस्कुल,एरंडोल ता.एरंडोल जि.जळगांव येथे उप शिक्षक म्हणुन कार्यरत आहेत. दि.२७/०३/२०२३ रोजीचे आदेशान्वये आरोपी क्रं.३ यांनी फिर्यादी व त्यांचे सहकारी मित्र उप शिक्षक चौधरी यांची महात्मा फुले हायस्कुल,एरंडोल या शाखेतुन महात्मा फुले हायस्कुल,धरणगांव या शाखेत बदली करुन बदली ठिकाणी हजर रहावे बाबत आदेश केले आहेत. सदर आदेशाप्रमाणे दि.३१/०३/२०२३ रोजी आलोसे क्रं.१ यांनी फिर्यादी व त्यांचे सहकारी मित्र चौधरी यांना बदली ठिकाणी हजर होणेसाठी कार्यमुक्त केले असुन शिक्षकांच्या बदल्यांना मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.शिक्षणाधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग,जिल्हा परीषद,जळगांव यांना दि.०२/०५/२०२३ रोजी सादर केला आहे.<br>फिर्यादी व त्यांचे सहकारी उप शिक्षक श्री.चौधरी यांची धरणगांव येथे झालेली बदली करणे संदर्भात ते दोघे दि.१२/०६/२०२३ रोजी आलोसे क्रं.१ श्री.विनोद जाधव,प्रभारी मुख्याध्यापक यांना भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयात गेले होते. तेव्हा सदर ठिकाणी आलोसे क्रं.२ श्री.नरेंद्र वाघ,लिपीक हे सुद्धा हजर होते. तेव्हा फिर्यादी व त्यांचे सहकारी उप शिक्षक श्री.चौधरी अशांनी त्यांची बदली रद्द करणेबाबतचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी जळगांव यांना पाठविण्याचे मोबदल्यात आलोसे क्रं.१ व २ तसेच आरोपी क्रं.३ यांनी फिर्यादी व त्यांचे सहकारी उप शिक्षक श्री.चौधरी यांचेकडेस त्यांचे प्रत्येकी एक महिन्याच्या पगाराच्या रकमेची चेकव्दारे लाचम मागणी केली होती. त्याप्रमाणे आज दि.१४/०६/२०२३ रोजी फिर्यादी यांचेकडुन त्यांचे एक महिन्याचे पगाराचा ७५,०००/–रुपयाचा चेक व त्यांचे सहकारी मित्र उप शिक्षक चौधरी यांचे एक महिन्याचा पगाराचा ७१,०००/–रुपयाचा चेकची मागणी करुन फिर्यादी यांचेकडे ७५,०००/–रुपयांचा चेक आरोपी क्रं.३ यांचे करिता आलोसे क्रं.१ यांनी वर नमुद वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे कडुन पंचासमक्ष आलोसे क्रं.२ यांचे उपस्थितीत स्वत: स्विकारला म्हणुन गुन्हा. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:–** अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.
**ईमेल आयडी:–** dyspacbjalgaon@gmail.com
**संकेतस्थळ:–** acbmaharastra.gov.in
**टोल फ्री क्रमांक:–** 1064,**दुरध्वनी क्रमांक:–**0257-2235477
**व्हॉटस्अॅप क्रमांक:–** 8766412529

14.06.2023

शशिकांत श्रीराम पाटील
पोलीस उप अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

पोलीस उप अधिक्षक • अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव